दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे निर्भिड दैनिक

# वादळ वार्ता

मुख्य संपादक : अजय भांगे



लोकनेते मा.गोपीनाथराव मुंडे साहेब यांच्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन
-संपादक

बीड/महाराष्ट्र | गुरुवार दि.१२ डिसेंबर २०२४ | आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ | वर्ष २ रे | अंक-१०५ | पाने ४ | किंमत ४ रुपये

# बीडचा झाला बिहार

## बीड जिल्ह्यात गुन्हेगारीचा कळस;खा.बजरंग सोनवणेंनी घेतली केंद्रीय गृहमंत्र्यांची भेट

### अपहरणाच्या प्रकरणांची सीबीआयमार्फत चौकशी करण्याची केली मागणी

**बीड । प्रतिनिधी**

खून,मारामाऱ्या आणि अपहरणाच्या गुन्ह्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. असे असताना पोलीस निपक्षपातीपणे कारवाई करायचे सोडून अशासकिय लोकांच्या दबावात काम करत आहेत. यामुळे जिल्ह्यात गुन्हेगारीने कळस गाठला असून जिल्ह्यातील गुन्हेगारी कमी व्हावी, अपहरणांच्या प्रकरणांची सीबीआय मार्फत चौकशी करावी, या मागणीसाठी खा.बजरंग सोनवणे यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेतली. यावेळी अमित शहा यांनी ठोस कारवाईचे आश्वासन दिले.

दिल्ली येथे दि.११ डिसेंबर रोजी खा.बजरंग सोनवणे यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेतली. जिल्ह्यात बिघडलेल्या कायदा व सुव्यवस्थेबाबत शहा यांना पत्र दिले असून पत्रात म्हटले आहे, बीड जिल्ह्यात गेल्या पाच-सहा वर्षांमध्ये कायदा व सुव्यवस्थेची स्थिती अत्यंत खराब झालेली आहे. कोणत्याही प्रकरणात अशासकिय लोकांचा हस्तक्षेप होत असल्याने पोलीस यंत्रणा हातचे बाहूले बनून काम करत आहे. अर्थातच पोलीस निपक्षपातीपणे काम करत नाहीत. परिणामी, जिल्ह्यात वाळूमाफिया, भुमाफिया, गुटखा माफिया, खंडणी, खून, अवैध शस्त्रांचा व्यापार फोफावत आहे. परळीत अमोल डुबे यांचे अपहरण करून त्यांच्याकडून खंडणी वसूल करण्यात आली. यानंतर त्यांना अंधाऱ्या रात्री घाटात सोडून दिले. मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांनी पवनचक्की प्रकरणात खंडणीला विरोध केला म्हणून अपहरण करून हत्या केली. संतोष देशमुख यांचे अपहरण झाल्याचे कळताच मी जिल्हा पोलीस अधिक्षक अविनाश बारगळ यांना सलग फोन केले. मॅसेजेस केले परंतु संपर्क होऊ शकला नाही. दरम्यान, संतोष देशमुख यांचा मृत्यू झाला. पोलीस अधिक्षक यांचा संपर्क होऊ शकला असता तर कदाचित त्यांचा जीव वाचला असता. यामुळे पोलीस अधिक्षकांच्या भुमिकेबाबत संशय निर्माण होत आहे. बीड जिल्हा पोलीसांकडून खोट्या केसेस करणे आणि खऱ्या अपराधाकडे दुर्लक्ष करणे सरावाचे झाले आहे. यामुळे कायद्याची अमलबजावणी होणे अशक्य झाले आहे. पाटोदा पंचायत समितीचे माजी सभापती गोवर्धन सानप हे दोन दिवस बेपत्ता होते. त्यांचा ग्रामस्थांनी शोध घेतला परंतु दोन दिवसांनी त्यांचे प्रेत शेतात आढळून आले. हा मृत्यू कशामुळे झाला, याचेही ठोस कारण पोलीसांनी दिलेले नाही. याबाबतही संशय आहे. अशा अपहरणांच्या प्रकरणाची सीबीआय चौकशी व्हावी, याच बरोबर जिल्हा पोलीस दलाबाबत सामान्य माणसांच्या मनात अविश्वास निर्माण झालेला आहे. यामुळे केंद्रीय सुरक्षा यंत्रणेकडून विशेष पथक बीड जिल्ह्यात पाठवून याठिकाणी कारवाया कराव्यात, जेणेकरून पोलीसांकडून आयपीसी कलमांचा दुरूपयोग होणार नाही, पोलीस यंत्रणा कोणाच्या दबावात काम करणार नाही. याचबरोबर पवनचक्की कंपन्यांच्या गुडांनी जो गुन्हेगारीचा आलेख वाढविण्याचे काम केले आहे तो आलेखही कमी होईल, गुंडगिरीचा वापर करत असल्यामुळे पवनचक्की कंपन्यांवर गुन्हे दाखल करावेत असेही पत्रात म्हटले आहे. याविषयावर केंद्रीय मंत्री अमित शहा यांनी तातडीने ठोस पाऊले उचलली जातील, असे आश्वासन दिले.



## संतोष देशमुख यांचा सलग एक ते दीड तास मारहाणीने मृत्यू !

### प्रथम दर्शनी उत्तरीय तपासणीनंतर आढळून आली माहिती

**केज । प्रतिनिधी**

मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांना गॅस पाइप किंवा आतमध्ये मोठी तार असलेल्या जाड वायरची पिळवटी करून मारहाण करण्यात आली. साधारण एक ते दीड तास सलग मारहाण झाल्याने त्यांचा मृत्यू झाला. दोन्ही डोळ्यांसह डोके, पोट, छातीवर मारहाणीचे गंभीर व्रण उत्तरीय तपासणीत आढळून आले.



मंगळवारी दि १०रात्री वाजता केज उपजिल्हा रुग्णालयातील वैद्यकीय चमूने ही उत्तरीय तपासणी केली. संवेदनशील प्रकरण असल्याने खुद्द जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अशोक थोरात केज रुग्णालयात थांबून होते. देशमुख यांचे सोमवारी दि. ९ रोजी तीन वाजता सांवतवाडी जवळील टोलनाक्यावरून अपहरण करण्यात आले.त्यानंतर त्यांना एका वाहनात नेऊन मारहाण झाली. पुन्हा तीन तासांनी त्यांचा मृतदेह दैठणाजवळ टाकण्यात आला.मंगळवारी रात्री घटनेच्या २६ तासांनी मृतदेह ताब्यात घेऊन उत्तरीय तपासणी करण्यात आली. यात संतोष देशमुख यांच्या छातीवर, पोटावर, डोक्यावर आणि डोळ्यांवर गंभीर प्रहार करण्यात आला. त्यामुळे शरीरातील आतल्या भागात रक्त साकाळून त्यांच्या मृत्यू झाल्याचे प्रथमदर्शनी आढळले आहे.संतोष देशमुख यांचे वाहन आडवून पाच ते सहा जणांनी त्यांना मारहाण करूनच अपहरण केले. वाहनातही त्यांना जबर मारहाण करण्यात आली. नंतर एखाद्या ठिकाणी वाहन थांबवून आरोपींनी मारहाण केल्याचा पोलिसांचा कयास आहे.

## परभणीतील घटनेवरून वंचित आक्रमक!

### औरंगाबाद विभागीय आयुक्तांना वंचित चे निवेदन

**परभणी । प्रतिनिधी**

परभणी शहरात एका समाज कंटकाने संविधानाची विटंबना केली या पार्श्वभूमीवर वंचित बहुजन आघाडी औरंगाबाद यांनी विभागीय आयुक्तांकडे निवेदन दिले आणि घटनेचा निषेध केला. या निवेदनात म्हटले आहे की, परभणी शहरात संविधानाच्या प्रतिकृतीची विटंबना झाल्यामुळे तणावाची स्थिती निर्माण झाली आहे. सदर घटना उघडकीस आल्यानंतर प्रशासन आणि पोलीस दलाने तात्काळ योग्य कारवाई करायला हवी होती. मात्र ते न झाल्यामुळे आज परिस्थिती चिघळली आहे. पोलिसांनी संविधानाच्या प्रतीकृतीची विटंबना करणाऱ्यांवर कठोर कारवाई केली पाहिजे.

भारतीय संविधानाचा विटंबना ही अतिशय लज्जास्पद बाब आहे. या पूर्वीही भारतीय संविधान आणि आंबेडकरी प्रतीकांचा अपमान जाणीवपूर्वक करण्याचा प्रयत्न झालेला आहे. या घटनेतील सर्व आरोपींना पोलिसांनी २४ तासांच्या आत तत्काळ अटक करावी आणि कायदा व सुव्यवस्था राखण्यात यावी. आरोपींना तत्काळ अटक न झाल्यास त्याचे तीव्र पडसाद उमटण्याची शक्यता आहे. आरोपींना तत्काळ अटक करून, कायदा व सुव्यवस्था अबाधित राहील असे ठोस प्रयत्न करावेत अशी विनंती ही या निवेदनात केली आहे.यावेळी नेते अमितभाऊ भुईगळ, राज्य प्रवक्ता तय्यब जफर, जिल्हा अध्यक्ष सतीश गायकवाड, शहर अध्यक्ष पंकज बनसोडे, संदीप जाधव, मतीन पटेल, मेघानंद जाधव, काझी शकील, सतीश शिंदे आदी उपस्तिथ होते.



## जिल्हास्तरीय वकृत्व स्पर्धेत स्नेहा मोरे व ईश्वरी ढेरे प्रथम क्रमांक




**सोलापूर । विश्वास चोपडे**

दिनांक ९ डिसेंबर२०२४ रोजी, आदर्श पब्लिक स्कूल कुर्डूवाडी तालुका माढा येथे, आयोजित केलेल्या जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धेमध्ये जिल्हा परिषद केंद्र शाळा कव्हे येथील मोठ्या गटातील विद्यार्थिनी स्नेहा नागेश मोरे व लहान गटातील विद्यार्थिनी कुमारी ईश्वरी नागेश ढेरे जिल्हास्तरीय प्रथम क्रमांकाने यशस्वी झाल्या यशवंत विद्यार्थिनींचा गुणगौरव सोहळा मंगळवार दिनांक १०/१२/२०२४ रोजी जिल्हा परिषद केंद्र शाळा कव्हे येथे प्राथमिक शिक्षण विभाग कुर्डूवाडी बीटच्या प्राथमिक शिक्षण विस्तार अधिकारी आदरणीय शोभा लोंढे मॅडम यांच्या उपस्थितीमध्ये संपन्न झाला.या गुणगौरव सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष नवनाथ ताकमोगे हे होते या गुणगौरव सोहळ्याचे आयोजन जि प प्रा शाळा कव्हे शाळेचे मुख्याध्यापक सर्व शिक्षक व शालेय व्यवस्थापन सदस्य यांनी केले होते लोंढे मॅडम व गावातील ग्रामस्थांनी रोख रक्कम देऊन व वस्तुरूपाने बक्षीस देऊन यशवंत विद्यार्थ्यांना प्रेरणा दिली व यथोचित गुणगौरव केला. कार्यक्रमासाठी शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सर्व सदस्य गावातील प्रतिष्ठित सर्व नागरिक शालेय व्यवस्थापन समिती मधील शिक्षण तज्ञ हर्षल वाघमारे माजी शिक्षण तज्ञ विनोद ढेरे शाळेतील सर्व शिक्षक वृंद उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री रणजीत शेळके यांनी केले यशवंत विद्यार्थ्यांना केलेले मार्गदर्शक शिक्षक श्री रणजीत शेळके व गोडगे मॅडम यांचा सन्मान आदरणीय लोंढे मॅडम यांच्या हस्ते करण्यात आला याच शाळेतील क्रीडा शिक्षक इंगळे सरांनी आपले मनोगत व्यक्त केले व शेवटी सोलापूर जिल्हा प्राथमिक शिक्षक संघाच्या सरचिटणीस आदरणीय अंबुताई इतापे मॅडम यांनी आभार प्रदर्शन केले.

## वैजापूर-गंगापूर तालुक्यातील मुख्याध्यापकांची जिल्हा-अधिकाऱ्यांनी घेतली कार्यशाळा, दिले दशसूत्रीचे धडे !

### कृती आराखड्याप्रमाणे शाळांमध्ये सुविधा बळकटीकरण व दशसूत्री अंमलबजावणी करा- जिल्हाधिकारी दिलीप स्वामी

**छ.संभाजीनगर । प्रा संजय तुपे**

दि.११-जिल्हा परिषद शाळांमधील सुविधांचे बळकटीकरण मनरेगाच्या माध्यमातून करणे तसेच गुणवत्तापूर्ण व संस्कारक्षम विद्यार्थी घडविण्यासाठी दशसूत्री कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी दिलेल्या कृती आराखड्याप्रमाणे मुख्याध्यापकांनी काम करावे, असे निर्देश जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज लासूर स्टेशन येथे मुख्याध्यापकांच्या कार्यशाळेत केले. मनरेगा मधून जिल्हा परिषद शाळांमधील सुविधांचे बळकटीकरण करणे, तसेच दशसूत्री कार्यक्रमाची अंमलबजावणी करुन विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण व संस्कारक्षम करण्यासाठी आज

लासूर स्टेशन येथील पांडव लॉन्स येथे गंगापूर व वैजापूर तालुक्यातील मुख्याध्यापकांची कार्यशाळा आयोजीत करण्यात आली होती. उपविभागीय अधिकारी डॉ. अरुण जऱ्हाड. जिल्हा शिक्षणाधिकारी जयश्री चव्हाण, श्रीमती लाटकर, श्रीमती अरुणा भुमकर, प्राचार्य डाएट



श्रीमती सान्वी देशमुख, गंगापूरचे तहसिलदार डॉ. नवनाथ वांगवाड. वैजापूर तहसिलदार सुनिल सावंत. गंगापूर गटविकास अधिकारी सुहास वाकचौरे, वैजापूर गटविकास अधिकारी श्रीकृष्ण बेण्णीकर तसेच सर्व गटशिक्षण अधिकारी, शिक्षण विकास अधिकारी व मुख्याध्यापक उपस्थित होते.जिल्हाधिकारी स्वामी म्हणाले की. शाळांमधील सुविधांच्या विकासासाठी मनरेगातून निधीची उपलब्धता असून यासाठी करावयाची कार्यवाही ही कालबद्ध कार्यक्रमाप्रमाणे करावयाची आहे. त्याप्रमाणे मुख्याध्यापक. शिक्षण विस्तार अधिकारी, गट शिक्षणाधिकारी. तहसिलदार व उपविभागीय अधिकारी यांनी अंमलबजावणी करावयाची आहे. त्यांनी पुढे सांगितले की. विद्यार्थ्यांना घडविणे हे अत्यंत पवित्र कार्य आहे. मुलांना देशाचे भावी नागरिक म्हणून आपण घडवित आहोत ह्या जबाबदारीचे भान असू द्यावे. त्यासाठी विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासाठी दशसूत्री कार्यक्रम तयार केला आहे. त्यासाठी निधीची आवश्यकता नाही. वेगळा वेळ द्यायची गरज नाही, हा कार्यक्रम आपल्याला आपली दैनंदिन शैक्षणिक काम करीत असतांनाच करता येणार आहे. या कामातून आपल्याला चांगले काम केल्याचे समाधान मिळणार आहे. असे जिल्हाधिकारी स्वामी यांनी सांगितले. त्यांनी दशसूत्री कार्यक्रमाचे सादरीकरण सविस्तर विवेचन केले.

प्रास्ताविक जिल्हा शिक्षणाधिकारी जयश्री चव्हाण यांनी केले. गटशिक्षणाधिकारी समाधान आराख यांनी आभार मानले तर राजेश हिवाळे यांनी सूत्रसंचालन केले. या कार्यक्रमस्थळी विद्यार्थ्यांचे विज्ञान प्रकल्प सादरीकरण, ग्रंथप्रदर्शन ही आयोजित करण्यात आले होते. तसेच शिक्षकांच्या कला संचाने साक्षरता या विषयावर पथनाट्य सादर केले.

## संपादकीय..

# थाली बचाव!

रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर शक्तिकांत दास म्हणतात की चालू आर्थिक वर्षाच्या तिसऱ्या तिमाहीच्या अखेरीस चलनवाढीचा वेग मंदावेल. छान. ही तिसरी तिमाही म्हणजे ऑक्टोबर ते डिसेंबर. म्हणजे सर्व सण–वार संपल्यावर महागाई कमी होईल. ज्या वेळी फारशी काही खरेदी करावयाची नसते त्या वेळी दर कमी होतील. हा युक्तिवाद त्यांनी व्याजदर कपातीच्या संदर्भात केला. चलनवाढीवर एक उतारा हा व्याजदर वाढीचा असतो. व्याजदर वाढले की पैशाचा पुरवठा कमी होतो आणि चलनवाढ टळते. अलीकडेच झालेल्या रिझर्व्ह बँकेच्या बैठकीत व्याजदर कपातीचा मुद्दा आला असता ती करण्याविरोधात बहुमताने निर्णय घेतला गेला. त्याआधी काही आठवड्यांपूर्वी विद्यमान सरकारातील काही विद्वानांनी महत्त्वाचे खाद्यपदार्थ घटक चलनवाढ निर्देशांक मापनातून वगळण्याची सूचना केली होती. या घटकांमुळे महागाई झाल्याचे दिसून येते, म्हणून त्यांस निर्देशांक मापनातून वगळावे अशी या अधिकाऱ्यांची मसलत. या सूचनेची तुलना महाराष्ट्रातील शिक्षण आराखड्यातील गणित या विषयासंदर्भातील निर्णयाशी करता येईल. शालेय विद्यार्थ्यांस जे विषय जड जातात, त्यात गणित अग्रक्रमावर. यात अनुत्तीर्ण होणाऱ्यांचे प्रमाणही अधिक. ही अनुत्तीर्णांची संख्या कमी करण्यासाठी आपले राज्य सरकार उत्तीर्णतेची किमान गुणांची आवश्यकता ३५ वरून २० वर आणू पाहते. म्हणजे कमी विद्यार्थी अनुत्तीर्ण होतील, हा हिशेब. हा तर्कवाद पुढे नेल्यास काही सरकारी विद्वान; 'गणित हा विषय अभ्यासक्रमातून काढूनच टाका' असे सुचवणार नाहीतच असे नाही. म्हणजे गणितात कोणी अनुत्तीर्ण होण्याची शक्यताच नाही. तद्वत महागाई निर्देशांकातून दैनंदिन खाद्यापदार्थच काढून टाकले तर महागाईही नाहीशी होईल. याचा प्रतिवाद 'द हिंदु'ने नुकत्याच प्रकाशित केलेल्या विशेष लेखाने करता येईल.

कोणत्याही घरातील जेवणाच्या ताटातील किमान घटकांसाठी गेल्या वर्षी या काळात किती पैसे मोजावे लागले होते, आता या घटकांची किंमत काय आहे, गेल्या वर्षी या काळात सर्वसाधारण कामगारांचे वेतन काय होते, ते आता किती आहे या साध्या घटकांचा तपशील त्यांनी सादर केला आणि जेवणाच्या ताटातील घटकांची किंमतवाढ आणि सामान्यांसाठी झालेली–न झालेली वेतनवाढ यांच्याशी या घटकांची तुलना केली. खरे तर दैनंदिन अर्थशास्त्र समजून घेणे इतके सोपे आहे. यास गणप्याचे अर्थशास्त्र असे विद्वतजनांकडून हिणवले जात असले तरी गणप्यासही कळावे इतकी सुलभता या विद्वानांस आपल्या प्रतिपादनात आणता येत नाही. ती सुलभता आणणे हे पत्रकारितेचे खरे काम. 'द हिंदु'तील लेख हे करतो. चौरस आहारासाठी लागणाऱ्या घटकांतील दरवाढ यात मोजण्यात आली आहे. उदाहरणार्थ २५ ग्रॅम हिरव्या मिरच्या (दरवाढ २६.३ टक्के), २५ ग्रॅम लसूण (१२८ टक्के), पाव किलो टोमॅटो (२४७ टक्के), बटाटे (१८० टक्के), कांदे (५१.७ टक्के), कणीक (पाव किलो ३ टक्के), तांदूळ (अर्धापाव ०.७ टक्के घट), तूरडाळ (अर्धापाव २.६ टक्के घट) असे वेगवेगळे घटक यात विचारात घेतले गेले. गतसाली एका व्यक्तीच्या दोन वेळच्या जेवणाचा स्वयंपाक करण्यास लागणाऱ्या जिन्नसांसाठी १०१.८ रु मोजावे लागत. यंदा तेव्हढ्याच जेवणासाठी त्याच घटकांसाठी खर्च करावी लागणारी रक्कम १५४.४ रु इतकी आहे. गतसाली एका व्यक्तीच्या महिनाभराच्या दोन वेळच्या जेवणासाठी ३,०५३ रु लागत. आज हीच रक्कम ४,६३१ रु. इतकी आहे. आणि हे सर्व फक्त शाकाहारींसाठी. यात इंधनाचे खर्च धरण्यात आलेले नाहीत. ही मांडणी फक्त खाद्यान्नांसाठीच्या जिन्नसांच्या मूल्याबाबत आहे. याचा अर्थ एका व्यक्तीच्या दोन जेवणांच्या खर्चासाठीच्या रकमेत गेल्या १२ महिन्यांत तब्बल ५२ टक्के इतकी वाढ झाली. याची दखल का घ्यावयाची? प्रमुख कारणे तीन.

पहिले म्हणजे ही सर्व पाहणी महाराष्ट्रवासींचे जीवनमान गृहीत धरून करण्यात आलेली आहे. यातील सर्व घटकांचे या राज्यातील दर फक्त यात विचारात घेण्यात आलेले आहेत. टोमॅटो, बटाटा, कांदा यांच्या दरांत झालेली दरवाढ सामान्यांचे डोळे पांढरे करणारी आहे. ती किती आहे याचा तपशील वर आहेच. तथापि या खेरीज घराघरांतील जेवणांत वापरल्या जाणाऱ्या साध्या साध्या भाज्यांच्या दरांतही सरासरी ८९ टक्के इतकी दरवाढ गेल्या फक्त १२ महिन्यांत झाली. तिचा विचार करण्याचे आणखी एक कारण म्हणजे याच काळात झालेली वेतनवाढ. ती सरासरी ९ ते १० टक्के इतकीच आहे. याचा अर्थ उत्पन्न, एकंदर चलनवाढ आणि दोन जेवणांस आवश्यक किमान वस्तूंच्या दरांत झालेली दरवाढ यांचा कसलाही ताळमेळ नाही. म्हणजेच सामान्यांस हातातोंडाशी गाठ घालणे दिवसागणिक जिकिरीचे होऊ लागलेले आहे. यातील सामाजिक अंगही तितकेच महत्त्वाचे. म्हणजे हे सर्व सरासरी झाले. सरासरी ही बव्हंश: आकर्षक आणि सुखावणारी असू शकते. पण समाजात असमान जगणे वाट्यास आलेले घटकही महत्त्वाचे असतात. म्हणजे एकल माता, अनाथाश्रमातील जगणे वाट्यास आलेले, तितकेही नशिबात नाही असे बेघर, रोजगाराच्या प्रतीक्षेत असलेल्यांची घरे आदी मुद्दे विचारांत घेतल्यास अशांचे जगणे अधिकच महाग झाले असणार, हे उघड आहे. खेरीज स्त्री–पुरुष भेद यातही आहे. म्हणजे रोजगारावरील पुरुष मजुरांच्या वेतनात होणारी वाढ आणि महिला मजुरांचा रोजगार यात तफावत असते. त्यामुळे महिलांच्या उत्पन्नावर अवलंबून असलेल्या घरांसमोर अधिक मोठे आव्हान उभे राहते. हे वास्तव गंभीर असे.

आणि या वास्तवाचे कसलेही प्रतिबिंब याच राज्याचे भवितव्य ठरवण्यासाठी होत असलेल्या निवडणुकांत नाही, हे याचा विचार का करायचा याचे तिसरे कारण. राजकारण असे सामान्यांच्या जगण्यापासून इतके तुटलेले कधीही नव्हते. जनसामान्य आणि निवडणुकांच्या रिंगणात उतरलेले यांचा काडीचाही संबंध नाही, असेही महाराष्ट्रात इतक्या प्रमाणावर कधी घडलेले नव्हते. यात कळीचा आणि तितकाच वेदनादायी मुद्दा आहे तो या वास्तवास झाकून ठेवण्याच्या राजकारण्यांच्या प्रयत्नांत–त्यातही अधिक सत्ताधाऱ्यांस–येत असलेले यश. राज्यातील जाती/प्रजाती/पोटजाती/उपजाती असे अधिकाधिक भेद करावेत, या लहान लहान गटाच्या त्याहूनही लहान नेत्यांस जवळ करावे, आंजारून–गोंजारून, योग्य ते दाम मोजून त्याचा गंड आणि कंड शमवावा आणि त्या बदल्यात त्या लहानग्या नेत्याने आपल्या 'समाजा'चा पाठिंबा हे सर्व करणाऱ्यांस जाहीर करावा, हेच सध्या सुरू आहे. वास्तवात बेरोजगार दलित असो वा मराठा. त्याच्या वेदना सारख्याच असतात. परंतु आर्थिकदृष्ट्या सबळ वर्गातील समाजाची प्रतिकूल परिस्थितीस तोंड देण्याची क्षमता नेहमीच अधिक असते.म्हणजे सर्व गाडा खरे तर आर्थिक मुद्द्यावर येऊन थांबायला हवे. पण तसे करावयाचे तर हिशेब द्यावा लागणार. त्यापेक्षा सामाजिक गंडास फुंकर घालणे सोपे. त्यामुळे मूठभरांचा अहं सुखावतो आणि त्यावरच ही मंडळी समाधान मानून शांत होतात. पण त्यामुळे ना प्रश्नाचा आकार बदलतो ना त्यांची संख्या कमी होते. या साध्या वास्तवाकडे राज्यातील जनसामान्यांची डोळेझाक होत आहे हे दुर्दैव. ते विद्यामान निवडणुकांत पुरेपूर दिसते. सर्वच क्षेत्रातील महाराष्ट्राची पीछेहाट या मंडळींच्या गावीही नाही. म्हणून या मंडळींच्या इच्छेवर 'ताली बजाव' वादनात सहभागी न होता आपल्या जेवणाच्या 'थाली बचाव'चा विचार अधिक व्हायला हवा. तितका सुज्ञ महाराष्ट्रातील मतदार आहे का या प्रश्नाच्या उत्तरात निवडणुकीचे भवितव्य आहे.

# लाडकी बहीण,महायुतीचे आधार कार्ड

विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारी मिळविण्यावरून सर्वच राजकीय पक्षांत संघर्षाला उधाण आले आहे. यावेळी मोठ्या प्रमाणावर बंडखोरी होणार, याची सर्वच पक्षांना जाणीव आहे. विधानसभेत जाण्यासाठी पुढील पाच वर्षे थांबण्याची कोणाची तयारी नाही हे त्यामागचे खरे कारण आहे. बड्या नेत्यांचे सगेसोयरे, कुटुंबीय यांना उमेदवारी दिली जाते म्हणून नाराजी असली तरी त्या कुटुंबाची ताकद मोडून काढणे सोपे नाही हे वरिष्ठांना चांगले ठाऊक आहे. सत्ता मिळविण्यासाठी पक्षाला प्रत्येक आमदाराची गरज आहे. म्हणूनच निवडून येण्याची क्षमता असलेल्या इच्छुकालाच उमेदवारी देण्यात येत आहे. मॅन पॉवर, मनी पॉवर नि मसल पॉवर ज्याकडे हे तीन एम आहेत, त्याला पक्षाची उमेदवारी निश्चित मानली जाते. महाराष्ट्रात विधानसभेच्या २८८ जागा आहेत. लोकसभा निवडणुकीत राज्यात भाजपाला मोठा फटका बसला. भाजपा विरोधात मतदान झाले. विधानसभा निवडणुकीत पुन्हा महाआघाडीला यश मिळेल असे सर्वत्र वातावरण बनले. पण हरियाणा विधानसभेचे निकाल आले आणि राज्यात भाजपाला पुन्हा ऊर्जा मिळाली. हरियाणात काँग्रेस सत्तेवर येणार अशी सर्व सर्व्हेंची आकडेवारी सांगत असताना तेथील मतदारांनी पुन्हा भाजपाला सत्तेवर निवडून दिले. हरियाणात भाजपाने विजयाची हॅटट्रीक संपादन केली. लोकसभेत भाजपाला बहुमतापासून मतदारांनी दूर ठेवले तरी भाजपाची लोकप्रियता कमी झालेली नाही, हे हरियाणाच्या मतदारांनी दाखवून दिले.हरियाणाच्या निकालाने महाआघाडीच्या नेत्यांना महाराष्ट्रात जमिनीवर आणण्याचे काम केले. म्हणूनच विधानसभा निवडणुकीत महाराष्ट्रात नेमके काय होणार हे नामांकित ज्योतिषांना सांगणेही कठीण झाले आहे. विधानसभा निवडणुकीनंतर महाराष्ट्रात राजकीय स्थिरता असेल काय हा सर्वात महत्त्वाचा प्रश्न आहे. केंद्रात आपले सरकार आहे म्हणून निकालानंतर आपण कशाही सोंगट्या फिरवू शकतो असे आता भाजपाला करता येणार नाही. सन २०१९ ते २०२४ या पाच वर्षांत महाराष्ट्रातील राजकीय पक्षांनी अक्षरश: धुडगूस घातला. पाच वर्षांत तीन मुख्यमंत्री या राज्याने बघितले. देवेंद्र फडणवीसांचे ८० तासांचे सरकार, नंतर उद्धव ठाकरे यांचे अडीच वर्षांचे आघाडी सरकार व त्यानंतर एकनाथ शिंदे यांचे महायुतीचे सरकार या जनतेने अनुभवले आहे. विशेष म्हणजे कोणीही मुख्यमंत्री असले तरी अजितदादा पवार हे उपमुख्यमंत्री कायम आहेत, हा चमत्कारही याच पाच वर्षांत बघायला मिळाला. सलग पाच वर्षे मुख्यमंत्री राहिलेल्या देवेंद्र फडणवीस यांना एकनाथ शिंदे यांच्या सरकारमध्ये उपमुख्यमंत्री राहावे लागले, याची खदखद भाजपामधील त्यांच्या समर्थकांनी अनेकदा बोलून दाखवली. आता देवाभाऊंना भावी मुख्यमंत्री म्हणून त्यांच्या समर्थकांनी काही ठिकाणी फलकांवरही झळकवले. लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्राने महाआघाडीला झुकते माप दिले हाच भाजपाचा नि महायुतीचा मोठा पराभव होता. ४८ पैकी केवळ १७ मतदारसंघांत महायुतीचे खासदार निवडून आले ही भाजपा–शिवसेना (शिंदे) व राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) यांच्यावर मोठी नामुष्की होती. भाजपाच्या खासदारांची संख्या २१ वरून ९ वर घसरली म्हणून पक्षाने कोणाला जबाबदार धरले नाही याचेच मोठे आश्चर्य वाटते.राज्यात व केंद्रात सत्ता असून आणि उद्धव ठाकरे व शरद पवारांचे पक्ष फोडूनही भाजपाला लाभ मिळवता आला नाही. उलट सत्तेसाठी झालेली तोडफोड मतदारांना पसंत पडली नाही, हाच लोकसभा निकालाचा संदेश होता. राज्यात एकीकडे मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे यानी कंबर कसली आहे, भाजपाला निवडणुकीत धडा शिकविण्याची ते भाषा बोलत आहेत. विशेष म्हणजे आंदोलकांचे नेते शरद पवार, एकनाथ शिंदे किंवा अजितदादा पवार या दिग्गज मराठा नेत्यांवर एका शब्दाने टीका करीत नाहीत. त्यांचे निवडणुकीतील टार्गेट हे देवेंद्र फडणवीस आणि भाजपाचे उमेदवार आहेत. मराठा समाजाला शिंदे सरकारने दहा टक्के आरक्षण देऊनही आंदोलक नेत्यांचे समाधान झालेले नाही. मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण मिळाले पाहिजे, हा हट्ट त्यांचा कायम आहे. मराठा समाजाला सरसकट कुणबी प्रमाणपत्र द्यावे या मागणीपासूनही ते माघार घेण्यास तयार नाहीत. जरांगे यांनी मराठा आरक्षणासाठी आजवर सहा उपोषणे केली. त्यांच्या पाठीशी विशेषत: मराठवाड्यात मराठा समाज एकवटला आहे, हेच दृश्य वेळोवेळी बघायला मिळाले. मराठा समाजाची नाराजी नुकसानकारक ठरू नये यासाठी भाजपाला विशेष प्रयत्न करावे लागणार आहेत. हरियाणात जाट समाज काँग्रेसच्या पाठीशी एकवटला असल्याचे चित्र होते, तेव्हा भाजपाने बिगर जाट समाजाची मोट बांधून मोठी व्होट बँक उभी केली. तसेच महाराष्ट्रात बिगर मराठा समाजांना एकत्र आणणे ही भाजपाची मोठी कसोटी ठरणार आहे. धनगर समाजाला अपेक्षित आरक्षण मिळाले नाही म्हणून धुसफूस आहेच. शिवाय प्रहार संघटनेचे बच्चू कडू, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे राजू शेट्टी, छत्रपती संभाजी राजेंची स्वराज संघटना, अशी तिसरी आघाडी मैदानात उतरली आहे. राज ठाकरे यांची महाराष्ट्र नवनिर्माण सेना स्वबळावर रणसंग्रामात उतरली आहे. मुंबई, ठाणे, पुणे, नाशिकमध्ये महायुतीला किंवा महाआघाडीला मनसेकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. त्याशिवाय प्रकाश आंबेडकर यांची वंचित बहुजन आघाडी मते खेचणारच आहे. महायुतीत असूनही रामदास आठवले यांच्या पदरात काही भरीव पडलेले दिसत नाही. महाआघाडी व महायुती यामधील सहा राजकीय पक्षांची उमेदवारी ज्यांना मिळणार नाही, ते आपली ताकद या निवडणुकीत दाखवणार हे निश्चित आहे. आघाडी व युतीला त्यांच्याच पक्षातील बंडोबांशी मोठा सामना करावा लागणार आहे. हरियाणात एका काँग्रेस नेत्याच्या अहंकार व एकाधिकारशाहीपुढे पक्षात अन्य कोणाला विश्वासात घेतले गेले नव्हते, तशा चुका महाराष्ट्रात होऊ नयेत, दक्षता घेणे हे काँग्रेसचे हायकमांडचे काम आहे. हरियाणात भूपेंदिर सिंह हुड्डा यांच्या फाजिल आत्मविश्वासामुळे विजयाच्या टप्प्यात आलेली निवडणूक काँग्रेसला पराभवाकडे घेऊन गेली तसा फटका महाराष्ट्रात नाना पटोलेंच्या स्वभावमुळे बसू नये असे आघाडीतील नेत्यांनी बोलून दाखवले आहे. राज्यात भाजपा म्हणजे देवेंद्र फडणवीस हेच आहेत. देवेंद्र हाच भाजपाचा महाराष्ट्रातील चेहरा आहे. मोदी, शहा किंवा नड्डा यांचा सर्वाधिक विश्वास फडणवीसांवर आहे. भाजपाच्या जाहीर झालेल्या पहिल्या यादीत पहिले नाव देवेंद्र फडणवीस यांचे होते ही त्याची झलक आहे. चंद्रशेखर बावनकुळे हे प्रदेशाध्यक्ष असले तरी पक्षाचे केंद्रस्थान मुंबईतील मलबार हिलवरील सागर बंगला हाच आहे. एकनाथ शिंदे यांची ठाकरेंच्या शिवसेनेत नंबर २ अशी कधीच ओळख नव्हती. आता ते राज्याचे मुख्यमंत्री आहेत तसेच महायुतीचे नंबर १ चे नेते आहेत. महायुतीचा मुख्यमंत्रीपदाचा चेहरा कोण हे जरी जाहीर झाले नसले तरी महायुती ही एकनाथ शिंदेंच्या नेतृत्वाखाली विधानसभा निवडणुकीला सामोरे जात आहे हे भाजपाने सुद्धा मान्य केले आहे. एकनाथ शिंदे यांनी ठाकरेंच्या शिवसेनेत चाळीस आमदारांसह बंड करण्याची जी हिम्मत दाखवली त्याला तोड नव्हती. त्यांच्या बंडाने शिवसेनाप्रमुखांच्या पुत्राला, उद्धव ठाकरे यांना मुख्यमंत्रीपदावरून पायउतार व्हावे लागले. भाजपाच्या आशीर्वादाने व संरक्षक कवचाने एकनाथ शिंदे हे महाराष्ट्राच्या सर्वोच्च सिंहासनावर बसले असले तरी संपूर्ण महाराष्ट्रात अल्पावधीत जनतेचा नेता अशी त्यांची प्रतिमा निर्माण झाली आहे.

रोज १८ तास काम करणाऱ्या या नेत्याकडे दूरदृष्टी आहे. कामाचा झपाटा आहे. कमी वेळात विकासाची कामे मार्गी लावण्याचे कौशल्य आहे आणि उद्योग व्यवसायात प्रचंड गुंतवणूक त्यांनी महाराष्ट्रात आणली आहे. एवढी ऊर्जा, उत्साह, कार्यक्षमता, तत्परता त्यांच्याकडे येते कोठून? भाजपापेक्षा कोणत्या नेत्यापेक्षा आपण सरस आहोत हे त्यांनी आपल्या कामांनी सिद्ध करून दाखवले आहे. म्हणूनच मोदी–शहांचा थेट विश्वास संपादन करण्यात ते यशस्वी झाले आहेत. कार्यकर्ते संभाळणारा, लोकप्रतिनिधींची कामे विनाविलंब करणारा हा नेता आहे. शहरी व ग्रामीण भागातील जनतेला आपला नेता मुख्यमंत्रीपदावर आहे, असे वाटते, हीच त्यांच्या कामाची पावती आहे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना ही तर गेम चेंजर ठरणार आहे. लोकसभा निवडणुकीत महायुतीचे झालेले नुकसान लाडकी बहीण भरून काढणार आहे. या योजनेमुळे दोन कोटी तीस लाख बहिणींची व्होट बँक एकनाथ शिंदे यांनी आपलीशी केली आहे. लाडकी बहीण योजनेने महाआघाडीला धडकी भरली आहे. आपण लाडक्या बहिणींना दरमहा तीन हजार रुपये देऊ, या आश्वासनाने बहिणी सुखावल्या आहेत. ही योजना बंद होणार नाही, हा फार मोठा दिलासा एकनाथ शिंदे यांनी दिला आहे. लाडकी बहीण योजनेच्या श्रेयवादावरून महायुतीत चढाओढ असली तरी हीच योजना हे महायुतीचे आधार कार्ड ठरणार आहे.

# आघाडीचे अस्वस्थ नेते,रेवड्यांची खैरात



सत्ता नसल्याने राजकीय पक्षांचे नेते कसे सैरभैर होतात हे महाआघाडीच्या मुंबईतील प्रचारसभेतून दिसून आले. काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस व उबाठा सेना हे तीनही पक्ष उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील सरकारमध्ये राज्यात अडीच वर्षे सत्तेवर होते. शरद पवारांच्या कल्पक योजनेतून महाविकास आघाडीचा जन्म झाला आणि ठाकरे यांच्या पक्षाला त्यांनी शिताफीने भाजपापासून दूर करून आपल्या कळपात घेतले. केवळ सत्तेसाठी एकत्र आलेली मोट फार काळ टिकली नाही. तीनही पक्षांचे आचार–विचार वेगळे. तिन्ही पक्षांत अनेक नेते महत्त्वाकांक्षी. काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेसने ठाकरे यांना मुख्यमंत्रीपदाच्या मखरात बसवले पण त्यांना सत्ता राबवता येत नाही, ठाकरे यांना सरकार चालवता येत नाही, ठाकरे यांना आपल्या स्वत:च्या पक्षाचे आमदार संभाळता येत नाहीत याचेच दर्शन सर्व महाराष्ट्राला घडले. ठाकरे यांचे नेतृत्व कसे कुचकामी आहे याचाच अनुभव महाराष्ट्राला आला व त्याचा लाभ भाजपाला मिळाला.

काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस यांनी सत्ता अनेक वर्षे उपभोगली आहे. ठाकरे यांनीही मुख्यमंत्रीपदाची ऐश अनुभवली आहे. त्यामुळे हे तीनही पक्ष सत्तेशिवाय राहू शकत नाहीत. एकदा सत्तेची चटक लागली की, वाटेल ते करून सत्तेच्या परिघात जाण्यासाठी तडफड सुरू होते, तसेच महाआघाडीच्या मुंबईतील बीकेसी मैदानावर झालेल्या प्रचारसभेत दिसून आले. महाराष्ट्रातील विधानसभेच्या २८८ जागांसाठी येत्या २० नोव्हेंबरला मतदान होणार आहे. राज्याच्या राजधानीत सभा घेतली की, त्याचे थेट प्रक्षेपण वृत्तवाहिन्यांवरून होते व घराघरांत प्रचार पोहोचतो. काँग्रेस पक्षाचे सर्वेसर्वा राहुल गांधी, पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार)चे अध्यक्ष शरद पवार, उबाठा सेनेचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे, मुंबई काँग्रेसच्या अध्यक्षा खासदार वर्षा गायकवाड अशा अनेक नेत्यांची फौज या सभेत मंचावर उपस्थित होती. महायुती सरकारचा पराभव करा व महाआघाडीला विजयी करा, हा एकच अजेंडा या सर्व नेत्यांकडे आहे. मोदी, शहा, शिंदे, फडणवीस यांच्यावर जोरदार टीका केली म्हणजे मते आपल्याकडे वळतील अशा स्वप्नरंजनात हे सर्व नेते आहेत. महाराष्ट्रात लोकसभा निवडणुकीत महायुतीला विशेषत: भाजपाला मोठा दणका बसला म्हणून विधानसभा निवडणुकीत महाआघाडीचे नेते डोक्याला बाशिंग बांधून फिरत आहेत.तीन पक्षांची सभा व तीन पक्षांचे झेंडे या सभेत फडकताना दिसत होते. तीनही पक्षांचे कार्यकर्ते सभेला होते. त्यांना नेण्या–आणण्यासाठी शेकडो बसेसची व्यवस्था होती. पण अगोदरच्या तुलनेने महाआघाडीच्या सभेला गर्दी कमीच होती. जे लोक जमले होते, त्यांना पकडून आणले होते. सभेत कुठेही जोश नव्हता. टाळ्या घेणारा व गर्दी खेचणारा जबरदस्त वक्ता महाआघाडीकडे नाही, हे या सभेतून जाणवले. राहुल गांधींचे त्यातल्या त्यात आकर्षण. पण ते रोज तेच तेच बोलतात. संविधान बचावची हाळी देतात. खरे तर राहुल किंवा खरगे यांचे महाराष्ट्राला आकर्षण राहिलेले नाही. विधानसभा निवडणुकीत राष्ट्रीय मुद्दे चालत नाहीत, मग हे नेते बोलावून महाआघाडीला लाभ तरी काय होणार? खरगे सर्वात शेवटी बोलायला उठले. त्यांचे पद आणि त्यांचे वय बघून सभेत शिष्टाचार पाळला गेला हे उचित होते. पण ते माईकजवळ येताच लोक उठून निघाले. लोक मैदान सोडून जाऊ लागले, मला दहा मिनिटे द्या, अशी विनवणी खरगे यांना करावी लागली. पण लोकांना त्याबद्दल काहीच देणे–घेणे नव्हते. लोकांना काय पाहिजे, कोणाची भाषणे ते ऐकतात, हे जर महाआघाडीच्या नेत्यांना समजत नसेल, तर ते निवडणूक जिंकणार तरी कशी? सभेतील वक्ते भाजपाने ठाकरे सरकार पाडले म्हणून तुणतुणे वाजवत राहिले. त्यात त्यांनी नवीन काय सांगितले. आता अडीच वर्षांपूर्वीची सहानुभूती राहिली आहे का? भाजपाला संविधान कमकुवत करायचे आहे, असे सांगताना राहुल गांधी हातात लाल रंगाचे नोट पॅड उंचावून तावातावाने बोलताना दिसत होते. संविधान लाल रंगाचे कधी झाले? राहुल यांनी महाआघाडीची पंचसूत्री जाहीर करून मतदारांना आकर्षित करण्याचा प्रयत्न केला. महाआघाडी सत्तेवर आल्यावर आमचे सरकार महिलांना दरमहा ३००० रुपये देणार, राज्यात महिलांना बस प्रवास मोफत देणार, पंचवीस लाखांपर्यंत आरोग्य विमा व मोफत औषधे, जातिनिहाय जनगणना, आरक्षणाची ५० टक्के मर्यादा हटवणार, ३ लाखांपर्यंत शेतकऱ्यांना कर्जमाफी, नियमित कर्जफेड करणाऱ्याना ५० हजार प्रोत्साहन, बेरोजगार तरुणांना दरमहा ४ हजार रुपये इत्यादी महायुती सरकारच्या घोषणांची कॉपी करण्याचा प्रयत्न महाआघाडीने चालवला आहे.मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेतून सध्या दोन कोटींपेक्षा जास्त महिलांना दरमहा पंधराशे रुपये मिळू लागले आहेत. नोव्हेंबरचा हप्ता ऑक्टोबरमध्येच देण्याची किमया शिंदे सरकारने करून दाखवली. पुन्हा सत्ता मिळाल्यावर तीन हजार रुपये लाडक्या बहिणींना देऊ असे मुख्यमंत्री सांगत आहेत. म्हणून महाआघाडीने ४ हजार रुपयांचे आमिष युवकांना दाखवले आहे. दरमहा पंधराशे रुपये देण्यासाठी महायुती सरकारला ९० हजार कोटी लागणार आहेत. जर महिलांना दरमहा चार हजार रुपये दिले तर हा निधी कोठून आणणार यावर महाआघाडीचे नेते ब्र काढत नाहीत. महायुती सरकारने महिलांना निम्म्या तिकिटात एसटी बस प्रवासाची सवलत दिली आहेच. गरिबांना दरमहा पाच किलो धान्य मिळत आहे. शिवसेनाप्रमुखांच्या कल्पनेतून साकार झालेल्या एसआरए योजनेतून झोपडपट्टीवासीयांसाठी मोफत घरांची योजना चालूच आहे. जनतेची मागणी नसतानाही निवडणूक प्रचारात रेवड्यांचा वर्षाव चालू आहे. हे मोफत घ्या, ते मोफत घ्या पण आम्हाला सत्ता द्या, यासाठी महाआघाडीचे नेते घायकुतीला आले आहेत.

# २०३० पर्यंत सर्वांना साक्षर करण्याचे ध्येय पुर्ण होणार-आदित्य जीवने सीईओ

## उल्लास नवभारत साक्षरता जिल्हास्तरीय मेळावा संपन्न

**बीड । प्रतिनिधी**

केंद्र पुरस्कृत व महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण व क्रीडा विभाग वशिक्षणाधिकारी (योजना) बीड च्या वतीने उल्लास नवभारत साक्षरता कार्यक्रम। जिल्हास्तरीय उल्लास मेळावा बीड २०२४-२५ दि. १० डिसेंबर २०२४वेळ: सकाळी १० वाजता आयोजित करण्यात आले .

सदर कार्यक्रमास उद्घाटक म्हणुन श्री. नागनाथ शिंदे शिक्षणाधिकारी (मा.) जि.प. बीड ,श्री.भगवान फुलारी शिक्षणाधिकारी (प्रा.), डॉ.विक्रम सारुक प्राचार्य,जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था अंबाजोगाई उपस्थित होते. तर आयोजक म्हणून श्री. संजय पंचगल्ले शिक्षणाधिकारी (योजना),

श्री. माजिद काजी उपशिक्षणाधिकारी, श्री. राजाराम टकले अधिव्याख्याता, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, अंबाजोगाई हे उपस्थित होते.



राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या अनुषंगाने प्रौढ शिक्षणाच्या सर्व पैलूंचा समावेश करण्यासाठी सरकारने आर्थिक वर्ष २०२२-२०२७ या कालावधीसाठी नवीन भारत साक्षरता कार्यक्रम (नव भारत साक्षरता कार्यक्रम) सब पढ़ें सब बढेमंजूर केला. सर्वांसाठी शिक्षण ही संकल्पना मांडलेली आहे. २०३० पर्यंत सर्वांना साक्षर करण्याचे उद्देश या अभियानाचे आहे. दि ०२ फेबु २०२५ मध्ये नवसाक्षरांची परीक्षा होणार आहे.

या अनुषंगाने बीड येथील स्काऊट भवन येथे आयोजित कार्यक्रमात दुपारच्या सत्रात जिल्हा परिषद बीड चे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री आदित्य जीवने यांनी भेट देऊन उपस्थितांना मार्गदर्शन केले तसेच शिक्षकांमार्फत लावण्यात आलेल्या स्टॉलला भेट दिली व त्यांच्याशी संवाद साधला यावेळी ते म्हणाले की, नव भारत साक्षरता कार्यक्रम ही एक चळवळ आहे, उज्वल भविष्यासाठी आणि सशक्त नागरिक व सक्षम नागरिक निर्मितीसाठी साक्षरता हा मूलभूत मानवी हक्क आहे . १५ वर्षे आणि त्याहून अधिक वयाच्या सर्वांना राष्ट्राच्या विकासात योगदान देण्यास सक्षम बनवण्याचा प्रयत्न केला जात आहे . जिल्ह्यातील कामगारांची संख्या अधिक आहे त्यांना बनवले पाहिजे ऑनलाइन बँकेचे व्यवहार त्यांना सुद्धा जमले पाहिजे या उद्देशाने हा कार्यक्रम सर्व शाळांमध्ये यशस्वीपणे मागण्यात यावा अशा सूचना दिल्या.वाचन, लेखन आणि संख्यात्मक कौशल्यांसह कार्यात्मक साक्षरता प्रदान करण्यावर लक्ष केंद्रित करावे ,उल्लास नव भारत साक्षर अभियानांतर्गत सर्वांनी प्रयत्न करून २०३० पर्यंत प्रत्येकाला साक्षर करण्याचे ध्येय आपण साधणार आहोत .यासाठी आवश्यक प्रयत्न करणे गरजेचे आहे. ऊसतोड कामगार व त्यांच्या पाल्यांना शिक्षित करण्यासाठी विशेष प्रयत्नांची आवश्यकता आहे असे प्रतिपादन केले.

कार्यक्रमात ऑनलाइन सर्वे अभियानाचे १००% उद्दिष्टे पूर्ण केल्याबद्दल गटशिक्षणाधिकारी केज ,वडवणी आणि आष्टी यांचा तसेच साधन व्यक्ती इसाक मोमिन,राजेंद्र जाधव ,नागरगोजे विजय व महेश पवार यांनी याविषयी चांगले काम केल्याबद्दल त्यांचेही सत्कार करण्यात आले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व अधिकारी व कर्मचारी,शिक्षणाधिकारी कार्यालय (योजना) जि.प. बीड यांनी महत्त्वाची भुमिका बजावली.

# परभणीत संविधानाची तोडफोड, परळीत संविधान प्रेमींची तीव्र निदर्शने

**परळी । प्रतिनिधी**

परभणी येथे विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्या समोर ठेवण्यात आलेल्या संविधानाची तोडफोड करून विटंबना केल्याप्रकरणी याचा निषेध म्हणून तसेच जातीवादी आरोपीवर कठोर कारवाई करावी या मागणीसाठी परळीतील संविधान प्रेमींच्या वतीने राणी लक्ष्मीबाई टावर येथे तीव्र निदर्शने करण्यात आली.

परभणी येथील डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्यासमोर असलेल्या संविधानाच्या प्रतिकृतीची काल जातीयवाद्याने दगडफेक करून तोडफोड केली होती. या घटनेचे तीव्र पडसाद संपूर्ण महाराष्ट्रात उमटत आहेत. या अनुषंगानेच परळी वैजनाथ येथे आंबेडकरी समाज व अनुयायांच्या वतीने या घटनेचा निदर्शने करून तीव्र निषेध करण्यात आला आहे.




राणी लक्ष्मीबाई टावर चौक येथे जमा होऊन कार्यकर्त्यांनी निषेधाच्या घोषणा दिल्या. व आरोपीवर कठोर कारवाई करावी अशी मागणी केली.त्याचप्रमाणे या माथेफिरूच्या पाठीशी असलेल्या सूत्रधाराचा शोध घेऊन कारवाई करण्याची मागणी करण्यात आली. मागणीचे निवेदन परळीचे तहसीलदार व्यंकटेश मुंडे व शहर पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक नितीन गट्टूवार यांना तहसील निवेदनाची प्रत देण्यात आली.यावेळी निदर्शने आंदोलनात मोठ्या संख्येने आंबेडकर प्रेमी सहभागी झाले होते.

# रिपब्लिकन सेना लोहा तर्फे डॉ.बाबासाहेब आंबेडकर व भारतीय संविधानाच्या पुतळ्याच्या विटंबनेसंदर्भात मुख्यमंत्र्यांना निवेदन सादर

**लोहा । प्रतिनिधी**

लोहा(ता.प्र)महामानव,क्रांतीसुर्य,भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे नातू,रिपब्लिकन सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष सरसेनानी आनंदराज आंबेडकर यांच्या आदेशान्वये व समाजभूषण काकासाहेब खंबाळकर यांच्या मार्गदर्शनाखाली परभणीतील झालेल्या विटंबनेच्या निषेधार्थ लोहा तहसिलदार विठ्ठल परळीकर व लोहा पोलीस स्टेशनचे पोलीस निरिक्षक नागनाथ आयलाने यांच्यामार्फत महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन देण्यात आले.सदर विटंबना करणारा जातीवादी समाजकंटक सोपान पवार याने केलेल्या घृणास्पद कृत्याप्रकरणी देशद्रोहाचा गुन्हा दाखल करून असे नीच कृत्य त्याच्याकडून करवून घेणाऱ्या त्याला पाठीशी



घालणाऱ्याचां शोध पोलीस प्रशासनाकडून लवकरात लवकर घ्यावा.या व इतर प्रमुख मागण्या सदर निवेदनात देण्यात आल्या. सदर मागण्या पूर्ण न झाल्यास येत्या काही दिवसात रिपब्लिकन सेनेतर्फे तीव्र आंदोलन छेडण्याचा जाहीर इशारा सदर निवेदनात देण्यात आला आहे.या निवेदनावर आंबेडकरी चळवळीचे नेते बालाजी खिल्लारे,रिपब्लिकन सेनेचे मराठवाडा उपाध्यक्ष अनिलदादा गायकवाड,पत्रकार प्रदीप कांबळे सामाजिक कार्येकर्ते नवनाथ आढाव,नगरसेवक केतन खिल्लारे,सचिन आढाव,रवी लोणे,गिरीष भालेराव, काकासाहेब लोहकरे,गणेश दाढेल आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# बेटकबिलोली येथे ५ वा अखंड दत्तनाम सप्ताह व महापुजा कार्यक्रमाचे आयोजन



**नायगांव । हानुमंत चंदनकर**

नायगांव तालुक्यातील बेटकबिलोली येथे प्रतिवर्ष प्रमाणे याही वर्षी पाचवा अखंड दत्त नाम सप्ताह व महापूजेच आयोजन दिनांक ०८ १२ २०२४ ते १५ १२ २०२४ पर्यंत आयोजित करण्यात आले आहे सप्ताहातील दैनंदिन कार्यक्रम पाहटे ४ ते ६ भुपाळी ६ ते ८ पुजा ८ ते १२ भजन २ ते ६ पारा , रात्री ९ ते १२ महापुजा द भ प श्री शंकर महाराज गिरी बेद्रीकर,द भ प विश्वाभर पाटील लोहगावे नरसीकर यांच्या मार्गदर्शनाखाली व हस्ते दररोज महापुजा वरिल कार्यक्रमाचे आयोजन समस्त गावकरी मंडळ बेटकबिलोली यांच्या वतीने आयोजित करण्यात आला आहे व १४ डिसेंबर दत्त जन्मोत्सव सोहळा संपन्न होणार आहे दिनांक १५ डिसेंबर रोजी भव्य महापूजा व महाप्रसादाचा आयोजन करण्यात आलेला आहे तरी परिसरातील भाविक भक्तांना लाभ घ्यावा असे आवाहन ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आला.



**स्वराज्याची राजधानी किल्ले रायगड येथे छत्रपती मा.खा.संभाजी राजे भोसले यांची संपादक बालाजी जगतकर भेट घेतली व त्यानंतर संपूर्ण रायगडाचा इतिहास जाणून घेतला.**

# हिंदुस्तान जर्नलिस्ट असोसिएशनची घनसावंगी तालुका कार्यकारिणी जाहीर

**जालना । प्रतिनिधी**

हिंदुस्तान जर्नलिस्ट असोसिएशनची बैठक नुकतीच घनसावंगी येथील विश्रामगृहात प्रदेश अध्यक्ष असलम कुरेशी यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. याप्रसंगी पत्रकारांच्या विविध विषयांवर चर्चा करण्यात आली.

यावेळी प्रदेश कार्याध्यक्षा आयेशा खान मुलानी यांनी सांगितले की पत्रकारांच्या समस्या सोडविण्यासाठी हिंदुस्तान जर्नलिस्ट असोसिएशन सदैव तत्पर राहिल. या बैठकित प्रदेश उपाध्यक्ष बालाजी अडियाल उपस्थित होते.

या बैठकित हिंदुस्तान जर्नलिस्ट असोसिएशनची घनसावंगी तालुका कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. या कार्यकारिणीत घनसावंगी तालुका अध्यक्ष पदी अशोक घुमरे, तालुका कार्याध्यक्ष विठ्ठल साठे, तालुका महासचिव पदी काकासाहेब कासार, तालुका उपाध्यक्ष राजेंद्र बिडवे, तालुका उपाध्यक्ष राजू थोरात, तालुका उपाध्यक्ष संदिप देवडे, तालुका सचिव कृष्णा शेळके, तालुका




सहसचिव सुरेश पोटे, तालुका कोषाध्यक्ष दिनकर वाघ, तालुका उपकोषाध्यक्ष किरण मांगदरे, तालुका प्रसिध्दी प्रमुख कृष्णा बरसाले आदींची निवड करण्यात आली. याप्रसंगी नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना नियुक्ती पत्र देण्यात आले.

# खा.डॉ अजित गोपछडे यांनी पंतप्रधान मोदी यांना भेटून मराठवाड्याच्या विकासासाठी दिले निवेदन

**नांदेड । हानुमंत चंदनकर**

देशाचे लोकप्रिय पंतप्रधान श्री नरेंद्र मोदींजींची खासदार डॉ अजित गोपछडे यांनी आज सकाळी दिल्ली येथील निवासस्थानी भेट घेऊन मराठवाड्यातील कृषी,सिंचन,रेल्वे, महामार्ग रस्ते, आरोग्य विषयी विकासात्मक निवेदन दिले. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी सर्व विषयांवर सकारात्मक प्रतिसाद देऊन सबंधित खात्यांना त्वरित निर्देश दिले आहेत. डॉ अजित गोपछडे यांनी मणिपूर राज्य प्रभारी या नात्याने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना मणिपूर मधील विविध विकास विषयक विषयावरील निवेदनही दिले .



ऑर्गेनिक काळा तांदूळ, ऑर्गेनिक संत्री, हैंड मेड साडी, हैंडी क्राफ्ट, हैंड मेड चादरी व वस्त्रे भेट देऊन मणिपूर मधील प्रसिद्ध लेंग्यान म्हणजे तेथील सन्मानाची शाल पांघरून मा. पंतप्रधानांचा यथोचित सन्मान केला. जगातील लोकप्रिय नेते पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना सर्व भेटवस्तू आवडल्या. विशेषत: मणिपुरी लेंग्यान शॉल आज त्यांनी दिवसभर अतिशय आनंदाने परिधान केली होती. हा माझ्यासाठी सन्मान आहे असे ते म्हणाले. सर्व राज्य सरकारांच्या पाठिंब्याने अवयवदान आणि किडनी दानाचा लाभ गरजूंना मिळावा. महाराष्ट्रातील मराठवाड्यासारख्या दुष्काळी मागास भागातील शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी नांदेड जिल्ह्यातील बिलोली तहसील परिसरात खउ-ठ अंतर्गत केंद्रीय दुष्काळी कृषी व गवत संशोधन संस्थेचे मिशन कार्यालय हैदराबाद धर्तीवर स्थापन करण्यात यावे. रा स्व. संघाचे संस्थापक आद्य सरसंघचालक प पू डॉ. केशव बळीराम हेडगेवार जी यांचे मुळगाव कंदकुर्ती हे शिरूर ताजबंद ते निजामाबाद या राष्ट्रीय महामार्गाला जोडणे, मुंबई-जालना वंदे भारत एक्स्प्रेसचा नांदेडपर्यंत विस्तार करण्यात यावा, मराठवाड्यात शालिवाहन काळातील बौद्ध, जैन, शीख, सनातन कॉरिडॉर आणि दुरिजम सर्किट तयार करण्यात यावे. बोधन-लातूररोड नवीन रेल्वे मार्ग (बोधन-बिलोली-मुखेड-शिरूर-ताजबंद-लातूररोड) लवकर सुरू करण्यात यावा. नांदेड-लातूररोड नवीनरेल्वे मार्ग निर्माण कार्य सुरु करावे. मराठवाड्यातील कृषी उत्पादनांची निर्यात वाढवणे आणि मणिपूर राज्य सरकारच्या सहकार्याने मणिपूरच्या हस्तकला , हातमाग ,काळे तांदूळ,ऑर्गेनिक फळे व भाजी पाला उत्पादनांच्या निर्यातीला प्रोत्साहन देण्यासाठी एक व्यापक योजना तयार करणे, इम्फाळ ते देशाची आर्थिक राजधानी मुंबई येथे नॉन स्टॉप फ्लाईट लवकरच सुरू व्हावी. मराठवाड्यातील गोदावरी नदी शुद्धीकरण व संवर्धन, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी महाराष्ट्र शासन नदीजोड योजनेंतर्गत घेतलेल्या स्तुत्य निर्णयांवर त्वरित कार्यवाही करावी. नांदेड-बिदर रेल्वे मार्गाचे काम तातडीने सुरू करावे अश्या सर्व विषयांवर सखोल चर्चा केली आणि या सर्व प्रश्नांवर लवकरात लवकर आवश्यक ती कार्यवाही करू असे ठोस आश्वासन पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांनी खा. डॉ. अजित गोपछडे यांना त्यांच्या भेटी दरम्यान दिले.

# सर्व भारतीयांनी बंधुता संकल्पना मनात रुजवावी-सरकारी अभियोक्ता वर्षा मुकीम

## मानवी अधिकार दिन उत्साहात संपन्न

**जालना । असलम कुरेशी**

१० डिसेंबर हा दिवस मानवी हक्क दिन म्हणून सर्वत्र साजरा करण्यात येत असतो. भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय संविधानाच्या उद्देशिकेत स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्याय हे तत्व नमुद केले आहेत. या चार तत्वांचे पालन म्हणजेच मानवी अधिकार होय. नागरिकांनी आपल्यासह दुसऱ्यांच्या स्वातंत्र्याचा प्रथमत: विचार करणे गरजेचे असून सर्व भारतीयांनी बंधुता संकल्पना मनात रुजवावी, असे प्रतिपादन सरकारी अभियोक्ता वर्षा मुकीम यांनी केले. जिल्हाधिकारी कार्यालयातील महसूल भवनात मानवी हक्क दिनाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी त्या बोलत होत्या. यावेळी अपर जिल्हाधिकारी रिता मैत्रेवार, निवासी उपजिल्हाधिकारी गणेश महाडिक, जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे ड. महेश धन्नावत, तहसीलदार प्रणाली तायडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

सरकारी अभियोक्ता श्रीमती मुकीम म्हणाल्या की, १९४८ मध्ये संयुक्त राष्ट्र संघाने ३० मानव अधिकाराचे घोषणापत्र स्विकारले. तर १९९३ पासून भारतात मानव अधिकार कायदा लागू करण्यात



आला. राष्ट्रीय मानवाधिकार आयोग स्थापन झाला. भारतीय संविधानाने दिलेले हक्क हिरावल्यास ते मिळवून देण्याचे काम मानवाधिकार आयोग करतो. जीवनात मानवाला उत्कर्ष साधायचा असेल तर सर्वांना माणसाप्रमाणे जगू देणे महत्वाचे आहे. प्रत्येक मानवाला नेहमी आपल्या कर्तव्याची जाण हवी. मानवाची उत्क्रांती सांगुन समाजात जीवन जगत असतांना झालेल्या स्थितीबदलाचा आलेखही त्यांनी यावेळी मांडला. निवासी उपजिल्हाधिकारी श्री.महाडिक म्हणाले की, भारतामध्ये जन्मताच जे हक्क प्राप्त होतात ते मुलभूत हक्क भारतीय संविधानात सर्वांना समान देण्यात आले आहेत. भारतीय संविधानाने बहाल केलेले अधिकार हे जबाबदारीशिवाय पुर्ण होत नाहीत याची जाणीव ठेवणे महत्वाचे आहे. भारतीय संविधानाने सर्व नागरिकांना सुखी व आनंदाने जीवन जगण्याचा अधिकार दिलेला आहे. आपले कर्तव्य सचोटीने पार पाडले तर मानवी हक्क अबाधित राहतील. भारतातील सर्व नागरिकांना भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय संविधानात समान हक्क दिलेले आहेत. समाजातील गरीब व्यक्तीला न्यायालयात जाण्यासाठी विनामुल्य वकीलांची सहाय्यता मिळण्यासाठी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाकडे संपर्क साधावा, असे आवाहनही जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे ड. धन्नावत यांनी केले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक तहसीलदार प्रणाली तायडे यांनी केले. या कार्यक्रमास जिल्हाधिकारी कार्यालयाच्या इमारतीमधील विविध विभागाचे अधिकारी-कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# महाराष्ट्र राज्य शाळा कृती समितीचा पुरस्कार वितरण सोहळा मा.आ.दत्तात्रय सावंत यांच्या उपस्थितीत संपन्न



**सोलापूर । विश्वास चोपडे**

पुणे विभागाचे माजी शिक्षक आमदार दत्तात्रय सावंत प्रणित महाराष्ट्र राज्य शाळा कृती समितीचे माढा तालुक्यातील जिल्हास्तरीय शाळा शिक्षक पुरस्कार २०२४ पुरस्कार रविवार दिनांक ८ डिसेंबर २०२४ रोजी सिंहगड कॉलेज कोर्टी तालुका पंढरपूर येथे संपन्न झाला.

कृतिशील शाळा शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी पुरस्कार संजयमामा शिंदे माध्यमिक विद्यालय भोगेवाडी, आदर्श पब्लिक स्कूल कुर्डूवाडी (अंकुलगाव) बबनराव शिंदे माध्यमिक विद्यालय बैरागवाडी, सुनंदा विद्यानिकेतन टेंभुर्णी, महात्मा फुले विद्यालय अँड ज्युनिअर कॉलेज टेंभुर्णी या शाळानां कृतिशील शाळा पुरस्कार देऊन गौरवण्यात आले शिक्षण शास्त्र महाविद्यालय माढ्याचे प्रा हरिचंद्र आदिनाथ इंगळे यांना बी एड कॉलेज कृतिशील प्राचार्य पुरस्कार देण्यात आला.के एन भिसे कॉलेज कुडूवाडीचे डॉ. सचिन वामन लोंढे,आर्ट्स अँड कॉमर्स कॉलेजमाढ्याचे प्रेमचंद गुंडू गायकवाड यांना सीनियर कॉलेज कृतिशील प्राध्यापक पुरस्कार देण्यात आला जनता विद्यालय टेंभुर्णीच्या प्राध्यापिका उषा ज्ञानदेव पाटील, संत सावता माळी विद्यालय व उच्च माध्यमिक विद्यालय आरणचे प्रा.बाबासाहेब तम्मा शेळके, बबनराव शिंदे कनिष्ठ कला महाविद्यालयपरितेचे प्रा. विजय अशोक पाटील यांना ज्युनिअर कॉलेज कृतीशीलप्राध्यापक पुरस्कार,देण्यात आला. छत्रपती शिवाजी विद्यालय भिमानगरचे दत्तू अभिमान डेपे,नवभारत विद्यालय दारफळचे शंकर बाबासाहेब ढावरे, नागनाथ विद्यालय कुर्डू संजय सिकंदर लावंड, डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रशाला व महात्मा फुले ज्युनिअर कॉलेज कुर्डूवाडीचे रोहिदास भिकाजी सोनवणे, प्रगती विद्यामंदिर अँड ज्युनिअर कॉलेज कुडूचे रेशमा शरद अनंतकळस यांना कृतिशील मुख्याध्यापक पुस्कार देण्यात आला. श्री शिवाजी आश्रम शाळा केवडचे नरेश्वर राजाराम पाटील यांना कृतिशील आश्रमशाळा मुख्याध्यापक पुरस्कार, देण्यात आला. आर्या पब्लिक स्कूल माढ्याचे सागर जीवराज थोरात व डॉ. नेताजी करळे विद्यालय चिंचगावच्या प्रियंका विनोद शिंदे यांना कृतिशील इंग्लिश मीडियम स्कूल मुख्याध्यापक पुरस्कार,देण्यात आला.बेंबळे येथील विमलेश्वर विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाचे कुबेर दशरथ गायकवाड, भाई भाई विद्यालय चांदजचे भिमराव तुकाराम जगदाळे, संगनबत्सवेश्वर शिवयोगी कन्या प्रशाला मोडनिंब चे शेखर एकनाथ सुर्वे, संजीवनी विद्यालय मालेगावचे गजानन बाळासाहेब जोकार, कै मुकुंदराव हरहरे माध्यमिक आश्रमशाळा माढा उल्हास भास्कर सोनार, टेंभुर्णीतील ट्रिकल स्टार इंग्लिश स्कूल अँड ज्युनियर कॉलेजच्या मनीषा महेंद्र सोनवणे, पूज्य सुगंधा ताई पाटील विद्यालय भुताष्टे दत्तात्रय राजाराम देवकर यांना कृतिशील शिक्षक पुरस्कार देऊन गौरवण्यात आले. हिंदवी औद्योगिक प्रशिक्षण केंद्र कुडूवाडीचे संतोष शिवाजी कापरे यांना औद्योगिक प्रशिक्षण संस्था कृतिशील शिक्षक पुरस्कार, नूतन विद्यालय कुडूवाडीचे प्रकाश रामलिंग दळवी, खिलोबा विद्यालय अंजनगावचे विनोद सदाशिव काळे, संजयमामा शिंदे विद्यालय कुर्डूवाडीचे श्रीकांत अशोक सावंत यांना कृतिशील क्रीडा पुरस्कार देण्यात आला.कुर्मदास विद्यालय लऊळ तुकाराम नारायण भाकरे यांना कृतिशील ग्रंथपाल पुरस्कार देण्यात आला.कर्मवीर लोहकरे गुरुजी माध्यमिक विद्यालय उजनी (मा) नवनाथ अभिमान पिसे यांना कृतिशील लिपिक पुरस्कार देण्यात आला. प्रबोधनकार ठाकरे विद्यालय कव्हे संजय श्रीरंग शिंदे यांना कृतिशील शिक्षकेतर कर्मचारी पुरस्कार देऊन गौरवण्यात आले असे एकूण ३३ पुरस्कार प्रदान करण्यात आले. माननीय आमदार दत्तात्रय सावंत सर यांनी बोलताना कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉक्टर जानराव कुष्ठरोग तज्ञ, सोलापूर जिल्हा रुग्णालय समन्वयक जगताप मॅडम राज्य शासन पुरस्कार प्राप्त काटकर सर समाधान घाडगे आदर्श पब्लिक स्कूलचे संस्थापक अध्यक्ष अमोल सुरवसे, तसेच माढा तालुका महाराष्ट्र राज्य शाळा कृती समितीचे दत्तात्रेय ननवरे, नंदकुमार टोणपे गणेश कोकाटे खंडू जाधव संपर्कप्रमुख मयूर आखाडे समन्वयक गजानन लावर तसेच सर्व पुरस्कारप्राप्तीचे स्वागत केले.व महाराष्ट्र राज्य शाळा कृती समितीचे सर्व पदाधिकारी यांनी या सर्व कार्यक्रमाचे नियोजन केले त्याबद्दल त्यांचेही सरांनी आभार मानले.सरांनी बोलताना त्यांच्या भाषणामध्ये सांगितले तुम्ही सर्व आपापल्या शाळेमध्ये गुणवान आहात म्हणून आमच्या टीमने तुमची निवड केली. तुम्ही खात्रीने वेगळे आहात. सगळेच शिक्षक ग्रेट आहात. त्याचबरोबर रयतेचा राजा शिवराय यांच्या नावाने एक नाटक त्यांनी पाहिले त्यामध्ये शिक्षक टेन परसेंट शिक्षक आहेत शिक्षक हे करू शकतात त्यामध्ये १००० कलाकार आहेत हे शिक्षक करू शकतात. एवढी मोठी निर्मिती शिक्षक घडू शकतो हे नाटक प्रसिद्ध होत आहे तरी ते तुम्ही पहावे. तसेच पुरस्कारतियांना त्यांनी खूप खूप शुभेच्छा दिले व आणखीन मोठे व्हा अशी अपेक्षा व्यक्त केली.

## मस्साजोग प्रकरणात शासन-प्रशासनाने न्याय द्यावा-आ.संदीप क्षीरसागर

# पवनचक्की संदर्भाने होत असलेल्या बेकायदेशीर बाबींवर ही आळा घालण्याची मागणी

**बीड । प्रतिनिधी**

पवनचक्की धारकांकडून बीड जिल्ह्यात अनेक बेकायदेशीर गैरप्रकार होत आहेत. पवनचक्की संदर्भाने शेतकरी व नागरिक यांना धमकावणे, गुंडगिरी, फसवणूक झाल्याचे अनेक प्रकार समोर आले आहेत. यातच पवनचक्कीच्याच संदर्भातील प्रकरणातून केज तालुक्यातील मस्साजोग गावचे सरपंच असलेले स्व.संतोष देशमुख यांची निघृण हत्या झाली आहे. या प्रकरणात शासन आणि प्रशासनाने स्व.संतोष देशमुख यांच्या कुटुंबियांना संरक्षण आरोपींना तात्काळ अटक करून कायदेशीर कडक कारवाई करावी अशी मागणी आ.संदीप क्षीरसागर यांनी केली आहे.



बीड विधानसभा क्षेत्रासह संपूर्ण बीड जिल्ह्यात गेल्या दोन वर्षांपासून पवनचक्की कंपन्या कार्यरत असल्याचे दिसून येत आहे. दरम्यान या पवनचक्की कंपन्यांच्या मालक व हस्तकांकडून ग्रामस्थांना व शेतकऱ्यांना धमकावणे, फसवणे, मारहाण करणे, जमिनी बळकावणे, पवनचक्की चे काम करताना शेतातील पिकांचे नुकसान करणे असे अनेक प्रकार मागील काळात घडले आहेत. यासोबतच पवनचक्कीच्या कामात शेतकऱ्यांची जमिनीचे हस्तांतरण झाल्यानंतर शेतकऱ्यांना ठरलेल्या रकमेप्रमाणे देयके न देणे असेही गैरप्रकार पवनचक्की कंपन्यांकडून व त्यांच्या हस्तकांकडून घडलेले आहेत. आता तर या लोकांची थेट हत्या करण्यापर्यंत मजल गेली आहे. केज तालुक्यातील मस्साजोग गावचे सरपंच स्व.संतोष देशमुख यांची निघृण हत्या झाल्याचा प्रकार सोमवार (दि.९) रोजी बीड जिल्ह्यात घडला आहे. हा प्रकार म्हणजे कायदा आणि सुव्यवस्थेचे अक्षरश: वाभाडे काढल्यासारखा आहे. त्यामुळे या घटनेतील आरोपींना तात्काळ अटक करून कडक कायदेशीर कारवाई करावी. यासोबतच बीड मतदारसंघ क्षेत्रातील चौसाळा, नेकनूर, लिंबागणेश जिल्हा परिषद गटातील बहुतांश गावात देखील पवनचक्की मालक व त्यांच्या हस्तकांकडून वारंवार असे प्रकार घडले आहेत. त्यातून काही शेतकऱ्यांनी आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला आहे. पवनचक्की संदर्भाने बीड जिल्ह्यात कायदा आणि सुव्यवस्था संदर्भाने मोठा प्रश्न निर्माण होत आहे. याबाबत शासन आणि प्रशासनाने योग्य पाऊले घेऊन कारवाई करावी. यासोबतच गुन्हेगारी प्रवृत्तीला आळा घालण्यासाठी निष्पक्ष पवित्रा घ्यावा अशी मागणी आ.संदीप क्षीरसागर यांनी केली आहे. यासंदर्भात आ.क्षीरसागर यांनी मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री, मुख्य सचिव, विभागीय आयुक्त, महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण चे महासंचालक, जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक यांच्याकडे पत्रव्यवहार केला आहे.

# संतोष देशमुख खुन प्रकरणातील आणखी एक आरोपी पुण्यातून अटक

**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील मस्साजोग खून प्रकरण तपासात पोलिसांनी आणखी एका आरोपीला जेरबंद केले आहे. या प्रकरणातील आणखी एका आरोपीस बीड पोलिसांच्या स्थानिक गुन्हे शाखेने पुण्यात बेड्या ठोकल्या. प्रतिक भीमराव घुले (वय २५, रा. टाकळी, ता. केज) असे अटक केलेल्या आरोपीचे नाव आसून खून केल्यानंतर प्रतिक घुले पुण्याच्या दिशेने रवाना झाल्याची गुप्त माहिती पोलिसांना मिळाली होती. मिळालेल्या अचूक माहितीच्या आधारे पोलिसांनी त्यास ताब्यात घेतले. पोलिसांनी यापूर्वी जयराम माणिक चाटे (वय २१ रा. तांबवा ता. केज), महेश सखाराम केदार (वय २१ रा. मैंदवाडी ता. धारुर) या दोन आरोपींना अटक केली होती. आतापर्यंत एकूण तीन आरोपी पोलिसांच्या ताब्यात आले आहेत. दरम्यान, प्रतिक घुले यास आज बुधवारी न्यायालयात हजर केले जाणार असल्याची माहिती आहे.




# बहराई फॉउंडेशन तर्फे वेश्वि येथे स्वच्छता मोहीम

**उरण । विठ्ठल ममताबादे**

पर्यावरणाचे, निसर्गाचे संरक्षण व संवर्धन करणाऱ्या 'बहराई फाउंडेशन' या सामाजिक संस्थेतर्फे उरण तालुक्यातील 'श्री एकवीरा देवी मंदिर, वेश्वी' येथे स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. काही दिवसांपूर्वी तिथे पक्षी निरिक्षणासाठी गेलेल्या बहराईच्या सदस्यांनी तिथला कचरा पाहिला. मंदिराच्या सभोवताली प्लास्टिक सोबत दारूच्या बाटल्यांचा अक्षरशः विळखा होता. त्याचवेळी तिथे स्वच्छता करण्याची गरज असल्याचं लक्षात आलं. या ठिकाणी अगदी पायथ्या पासून ते वर मंदिरापर्यंत आणि मंदिरापासून पुढे रानात घेऊन जाणाऱ्या तिथल्या दोन पायवाटा, हा संपूर्ण परिसर पक्षी निरिक्षणासाठी उत्तम आणि नैसर्गिक दृष्ट्या समृद्ध असा आहे. त्यामुळे अशा ठिकाणी स्वच्छता व शांतता टिकून ठेवणं ही सर्वांचीच जबाबदारी आहे, अशी भावना बहराईच्या सदस्यांनी व्यक्त केली.

**माणूस श्रद्धेनं आपल्या मन:शांतीसाठी किंवा निवांतपणासाठी अशा पवित्र ठिकाणी गेल्यावर तिथे कचरा करून परतणार असेल तर अशा समाजाला प्रबोधनसोबतच आत्मपरीक्षणाची देखील नितांत गरज आहे. – वैभव पाटील सचिव, बहराई फाउंडेशन**



सकाळी ७ वाजल्यापासून १२ वाजेपर्यंत म्हणजे साधारण पाच तास चाललेल्या स्वच्छते दरम्यान, तिथून जमा केलेल्या कचऱ्यात प्लास्टिक आणि दारूच्या बाटल्यांच प्रमाण खूप अधिक होतं. हे विदारक चित्र समाजाची बिघडलेली मानसिकता दर्शविणारे आहे. त्यामुळे अशा उपक्रमातून समाजाची जनजागृती करणे खूपच गरजेचे आहे. श्री एकविरा मंदिर वेश्वि किंवा अशा कोणत्याही ठिकाणी आनंद अनुभवण्यासाठी जाताना आपलं निसर्गभान जागृत ठेवून, तिथल्या नैसर्गिक सौंदर्याला आपल्याकडून कोणतीही बाधा होणार नाही याची काळजी आपण प्रत्येकाने घेतली पाहिजे, हाच संदेश 'बहराई फाउंडेशन'ने आपल्या कृतीतून समाजाला देण्याचा प्रयत्न केला आहे . यावेळी श्रमदान करण्यासाठी बहाराई फाउंडेशनचे सदस्य, अंकिता ठाकूर, रामनाथ पाटील, महेश पालकर, विशाल ठाकूर, दौलत पाटील, तुषार पाटील यांच्यासोबत बहराई फाउंडेशनचे कोषाध्यक्ष सुरेंद्र पाटील व सचिव वैभव पाटील हे सहभागी होते.

# युवा कार्य प्रशिक्षण योजनेतील प्रशिक्षणार्थींना किमान वेतन २० हजार मानधन देण्यात यावे

**नायगांव । हानुमंत चंदनकर**

नायगांव तालुक्यातील युवा कार्य प्रशिक्षण योजनेतील प्रशिक्षणार्थींना वीस हजार मानधन देण्यात यावे यासाठी तहसीलदारांना निवेदन

काम करून हे दप्तर दिरंगाई मुळेच विद्या वेतन मिळत नसेल तेव्हा दिरंगाई करणाऱ्या वर योग्य ती कारवाई करावी. सहा महिन्याचे यशस्वी प्रशिक्षण झाल्यानंतर आम्हाला कायमस्वरूपी रोजगार स्वयंरोजगार उपलब्ध करून द्यावे तसेच प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर इच्छुक उमेदवार उच्च ठिकाणी काम करत असतील तर त्यांना कुठेच कायमस्वरूपी करू असे प्रचार सभेत माननीय माजी मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे व मा कौशल्य विकास मंत्री मंगलजी प्रभात लोंढा साहेब यांनी म्हटले आहे. त्यानुसार प्रशिक्षणार्थींना कायमस्वरूपी करण्यात यावे. शासकीय आणि निमशासकीय नोकरांना प्रासंगिक रजा वैद्यकीय रजा आहेत त्या आम्हालाही



देय असावे वेगवेगळ्या शासकीय विभागाच्या परीक्षा भरती प्रक्रियेमध्ये प्रशिक्षणार्थींनासाठी दहा राखीव जागा ठेवण्यात यावे. असे निवेदन देण्यात आले .जोंधळे प्रदीप लालवंडीकर,बालाजी मांडलापुरे,सय्यद जब्बार,ज्ञानेश्वर घंटेवाड,मोईन हैदसाब, पवार दशरथ,वाघमारे विठ्ठल,राठोड पांडुरंग,कांबळे प्रमेश्वर,तिरुपती डोईफोडे,सचिन सोनकांबळे, श्रावण जाधव,गोविंद मावले,बसवेश्वर महाजन,कल्याण योगेश,वाघमारे हनमंत,जाधव इंद्रजीत,निखील भोगे प्रदीप राठोड,गोविंद नकाते,जोगदंड जयश्री,पिसाळे अश्विनी ,अवधूत चिखले,विशाल पवळे,केशव कदम बश्वराज केते,ज्ञानेश्वर तोडे,अंकुश पाटील ,ज्ञानेश्वर देगावे,कैलाश पांचाळ,शिवदास कुऱ्हाडे, नारायण होळकर,मिलिंद बचाव यावेळी सर्व प्रशिक्षणार्थी नायगाव तालुका संघ उपस्थित होते

# विहामांडवा परिसरात शेत वस्तीवर चोरांचा धुमाकूळ

**विहामांडवा /प्रतिनिधी**

पैठण तालुक्यातील विहामांडवा परिसरात दिनांक १० डिसेंबर २०२४ मंगळवार रोजी रात्री एक ते दोन वाजेच्या दरम्यान वडगाव रस्त्या लागत असलेल्या शेत वस्तीवर आठ चोरट्याने जवळपास दोन तास धुमाकूळ घातला होता, दरम्यान चोरट्यांनी हत्यारा सहित वृद्धांना मारहाण करू गंभीर जखमी केल्याची घटना घडल्यामुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे,

याबाबत सविस्तर वृत्त असे की, विहामांडवा परिसरात वडगाव रस्तालागत आजम मेहबूब पठाण वय ७५ वर्ष हे स्वतःच्या शेतामध्ये वास्तव्यास आहे या ठिकाणी रात्री चोरट्यांनी धुमाकूळ घालून राहता असलेल्या पत्राच्या शेडमध्ये घुसून सोन्याच्या दागिन्यासह गावरान कोंबडी व रोख रक्कम अंदाजे ८० हजाराचा ऐवज लंपास करून आपला मोर्चा अण्णासाहेब बर्डे यांच्या शेत वस्तीकडे वळविला, अण्णासाहेब बर्डे यांना गंभीर मारहाण करून





जखमी केले, त्यांच्या पत्नी यांच्या गळ्यातील सोने कानातील सोने काढत असताना कानाला गंभीर मार लागल्यामुळे गंभीर जखमी झाले, त्यांचाही सोन्या नागिन यासह हजारो रुपयाचा मुद्देमाल अल्मपास केला आहे, सदरील घटनेची माहिती मिळतात विहामांडवा पोलीस चौकीचे पोलीस उपनिरीक्षक बारहाते साहेब व जमादार शिंदे साहेब यांनी घटनास्थळी भेट दिली, वरिष्ठांना माहिती देताच पाचोड पोलीस स्टेशनचे प्रभारी पोलीस निरीक्षक श्रीमती सांगळे मॅडम यांनी आपल्या कर्मचाऱ्यासह घटनास्थळी भेट दिली व श्वान पथक फिंगरप्रिंट्स गुन्हे शाखा यांना पाचरन केले, पुढील तपास श्रीमती एपीआय सांगळेमॅडम , पोलीस उपनिरीक्षक राम बारहते साहेयांच्या मार्गदर्शनाखाली चालू आहे,

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077